ISSN 2278-8808 SJIF 2016: 6.177
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# शैक्षणिक संशोधनामधील शिक्षकांस उपयुक्त कृती संशोधन – एक अभ्यास

**श्रीम. माधुरी गोरखनाथ राऊत[१] &**
**डॉ. सुरेंद्र चंद्रकांत हेरकळ[२]** *(Page 120-124)*
*[१]एम.फिल. विद्यार्थी, आर्दश बहुव्यापी शिक्षण व संशोधन महाविद्यालय, कर्वे रोड, पुणे*
*[२]प्राचार्य, एम.आय.टी संत ज्ञानेश्वर बी.एड्. कॉलेज, आळंदी, पुणे.*

**SRJIS IMPACT FACTOR SJIF 2016**: 6.177
**Date of Issue Release:** 04/05/2017,
**Volume**: SRJIS, Mar-Apr, 2017, 4/31

***ABSTRACT***

*कृती संशोधनाच्या उपयोगामुळे अध्यापकांना दैनंदिन वर्ग अध्यापनातील समस्या सोडविण्यास मदत होते. कृती संशोधनाच्या चक्रीय आवर्तीव्दारे अर्थात नियोजन, कार्यवाही, अवलोकन आणि प्रत्याभरण यामुळे समस्या सोडविली जाते व जोपर्यंत समस्या सुटत नाही तोपर्यंत ही चक्रीय आवर्तीचा क्रम हा सुरू ठेवला जातो. म्हणून कृतीसंशोधन हे वर्गअध्यापन समस्यांवर एक गुरूकिल्ली समजण्यात येते.*

***महत्त्वाच्या संज्ञा :*** *कृती संशोधन , वर्गअध्यापन*

Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com

**प्रस्तावना :** कृती संशोधन हा एक उपयोजित संशोधनाचा प्रकार समजण्यात येतो. शिक्षणक्षेत्रात कृती संशोधनास महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. अध्यापकांना अध्यापन करीत असंताना त्यांच्या व्यवसायात अनेक समस्या निर्माण होत असतात. कधी कधी विद्यार्थी सतत गैरहजर असतो. अभ्यासपूरक कार्यक्रमात हिरीरिने भाग घेतांना दिसत नाहीत. अभ्यासात विद्यार्थी रस घेत नाहीत. यासाठी अध्यापकास वैज्ञानिक दृष्टिने अभ्यास करणे आवश्यक असते. एवढेच नव्हे तर विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी अध्यापकास प्रयत्न करावा लागतो. अध्यापकाने असे प्रयत्न करणे म्हणजे कृतीसंशोधन करणे होय.

**उद्दिष्टे :**

१. कृती संशोधनाचा अर्थ व स्वरूप समजावून घेणे.

२. कृती संशोधनाचे वर्गअध्यापनातील महत्त्व स्पष्ट करणे.

**कृती संशोधन :**

कृती संशोधन ही वर्तमानकालीन असते. अमेरिकेतील कर्ट लेविन यांनी १९४४ सर्वप्रथम कृती संशोधन या संज्ञेचा वापर केला. त्यांच्या मतानुसार, '' कृती संशोधन म्हणजे विशिष्ट टप्प्यांची आवर्त मांडणी होय. प्रत्येक आवर्तनात नियोजन, कार्यवाही, अवलोकन आणि प्रत्याभरण अशाप्रकारचे चार टप्पे पडतात. ''

The process by which practitioners attempt to study their problems scientifically in order to guide correct and evaluate their decision and action is ….. (called) action research. Dr. Stephen Corey (1953) P. 145

कृती संशोधनास शिक्षणक्षेत्रात अतिशय अग्रक्रम देण्यात येतो. या क्षेत्रात अनेक समस्या निर्माण होत असतात. अध्यापकास त्याच्या दैनंदिन अध्यापनात अनेक समस्या निर्माण होतात. त्यामुळे अशा समस्यांचे निराकरण करण्यासाठी अध्यापकास उपाय शोधावे लागतात. त्यासाठी योग्य पर्यायांची व उपक्रमांची अध्यापकास आखणी करावी लागते. म्हणून अध्यापक सतत प्रयत्नशील असला पाहिजे.

**कृती संशोधनाचे महत्त्व :**

अध्यापकास दैनंदिन अध्यापनात येणा—या समस्यावर मात करता येते. कृती संशोधनाने त्यांचे अध्यापन परिणामकारक करणे सुलभ होते. यामुळे कृती संशोधनास महत्त्व प्राप्त झाले आहे.

कृती संशोधनामुळे अध्यापकास,

१. समस्या सोडविण्यास कृतीशील रहावे लागते.

२. विद्यार्थ्यांचे सर्वांगीण विकासाचे परिणामकारक मार्ग शोधता येतात.

३. विद्यार्थ्यांना योग्य अशा अध्यापन पध्दती विकसित करणे.

४. स्वत: च्या प्रयत्नाने शास्त्रोक्त पद्धतीने स्वत:च्या शाळेतील सतत येणा—या समस्या सोडविण्यास सोयीचे होते.

५. शैक्षणिक अद्यावत पद्धती व त्यांची व्यावहारिकता आणि उपयोजन यात वृद्धी करून ती कायम करण्यास प्रयत्न करता येतो.

६. शिक्षणक्षेत्रात नवीन विचार प्रवाह सतत येत असतात. त्याविचारांची परिणामकारकता व उपयुक्तता तपासण्यास मदत होते.

७. शाळेतील दैनिक अध्यापनाचा स्तर वाढविण्यास संधी मिळते.

८. अध्यापक आणि विद्यार्थी यांच्या शैक्षणिक कार्यात पर्याप्त मूल्यमापन करण्यास वाव मिळतो.

**कृती संशोधनाची वैशिष्टये**

१. शास्त्रीय संशोधन पद्धतीच्या नियमांचे पालन करण्याची गरज नसणे.
२. समस्येवर उपाय शोधणे.
३. समस्या मर्यादित
४. अध्यापक सर्वेसर्वा
५. समस्या स्थानिक स्वरूपाच्या
६. सहकारी तत्त्वांवर अंमलबजावणी
७. मर्यादित उद्दिष्टे
८. दैनिक व्यवसाय जीवनाशी निगडीत विषय
९. लवचिक व परिवर्तनशील स्वरूप
१०. निष्कर्षाचे समान्यीकरण नसणे.

**कृती संशोधनाची आवश्यकता :**

१. दर्जदार अध्ययनासाठी योग्य वातावरण निर्मिती करता येते.

२. योग्य उपक्रम परिस्थितीनुसार प्रगतिशील देशातील विद्यार्थ्यांकरिता रूपांतरित करता येतात.

३. विद्यार्थ्यांना विविध गरजा पूर्ण करण्यासाठी योग्य मार्ग उपलब्ध करता येतात.


४. विद्यार्थ्यांना आवडणा—या अनेक परिणामकारक अध्यापन पद्धती विकसित करता येतात.

५. प्रयोगशील अध्यापक कृती संशोधनाने घडविण्यास मदत होते.

६. शिक्षणाची अद्‌यावतता, उपयुक्तता वाढविण्यास व कायम करण्यास मदत होते.

७. वेळ, पैसा आणि सामग्री यांचा वेळोवळी वापर करण्याचे कौशल्य करण्याचे कौशल्य प्राप्त होण्यास मदत होते.

**कृती संशोधनाची प्रक्रिया :**




वरील आकृतीत दाखविल्याप्रमाणे एक आवर्तन पूर्ण होण्यास चार टप्प्यांचा वापर करण्यात येतो. यासाठी अध्यापकासमोर एखादी समस्या असल्यास तिचे पूर्णपणे निराकरण करण्यासाठी या चारही टप्प्यांचा वारंवार वापर करणे आवश्यक असते.

चारही टप्पे पूर्ण झाल्यास एक आवर्तन पूर्ण झाले असे समजण्यास येते. या पहिल्या आवर्तनात संबंधित समस्येचे निराकरण झाल्यास दुस—या आवर्तनाची गरज भासत नाही. मात्र पहिल्या आवर्तनातील कार्यवाही सफल झाली नाही तर दुस—या आवर्तनास सुरूवात करणे आवश्यक असते. असे करताना दुस—या आवर्तनातील कार्यवाही मात्र पहिल्या कार्यवाहीपेक्षा वेगळी असते.

**निष्कर्ष :**

कृती संशोधनाच्या उपयोगामुळे अध्यापकांना दैनंदिन वर्ग अध्यापनातील समस्या सोडविण्यास मदत होते. कृती संशोधनाच्या चक्रीय आवर्तीव्दारे अर्थात नियोजन, कार्यवाही, अवलोकन आणि प्रत्याभरण यामुळे समस्या सोडविली जाते व जोपर्यंत समस्या सुटत नाही तोपर्यंत ही चक्रीय आवर्तीचा क्रम हा सुरू ठेवला जातो.

**संदर्भ :**

*घोरमोडे,के व घोरमोडे.(२००८)शैक्षणिक कृती संषोधन, (प्रथमावृत्ती),नागपूर,विद्या प्रकाशन, एकूण पृष्ठ १६८*

*पाटील,सुरेश.(२००६)कृती संशोधन व नवोपक्रम, (प्रथमावृत्ती),लातूर,संस्कार प्रकाशन, एकूण पृष्ठ १८२*

*साळी,करंदीकर व अहिरे.(२००७)कृती संशोधन व नवोपक्रम,(दुसरी आवृत्ती), कोल्हापूर, फडके प्रकाशन, एकूण पृष्ठ ८३*

*भालेराव,सुभाष.चव्हाण,शैला व शिंदे प्रतिभा.(२००९)शालेय व्यवस्थापन : तत्वे व कार्यवाही (प्रथमावृत्ती),नाशिक,गणेशपुजा प्रकाशन, एकूण पृष्ठ २२४*

*पंडित,ब.बि.(२००६)शैक्षणिक कृती संशोधन, (प्रथमावृत्ती),पुणे,नित्यनूतन प्रकाशन, एकूण पृष्ठ ९०*

*बेळे,गो व कक्कड गुरूप्रसाद.(१९९२)कृती संशोधन, (प्रथमावृत्ती),नाशिक,य.च.म.मु.वि. प्रकाशन, एकूण पृष्ठ १६*